# भारतातील स्पर्धात्मकता, आर्थिक विषमता आणि संविधानिक विकासदृष्टी

**धीरज कदम**
सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त) रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
ईमेल : dhiraj.kadam@gmail.com मो. क्र. 9922281541
https://orcid.org/0009-0009-7669-7717

**गोषवारा *(Abstract)***

*भारतातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत स्पर्धात्मकता (Competitiveness) आणि आर्थिक विषमता (Economic Inequality) या दोन परस्परावलंबी संकल्पना आजच्या विकास चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत. भारताने गेल्या तीन दशकांत उच्च आर्थिक वृद्धी, डिजिटल परिवर्तन, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि जागतिक स्पर्धात्मकतेमध्ये उल्लेखनीय प्रगती साधली असली, तरी उत्पन्न, संपत्ती, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता कायम असल्याचे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अहवालांमधून स्पष्ट होते. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या विनंती वरून 'Institute for Competitiveness' यांच्याद्वारे प्रकाशित State of Inequality in India Report (2022) आणि State of Competitiveness in India Report (2026) या अहवालांचे तुलनात्मक व चिकित्सक विश्लेषण करून स्पर्धात्मकता आणि विषमता यांतील परस्परसंबंधाचा अभ्यास करणे हा आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक, तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. अभ्यासातून असे निदर्शनास आले की उत्पादकता, नवोन्मेष, मानवी भांडवल आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेली प्रगती भारताच्या स्पर्धात्मकतेस बळकटी देत असली, तरी सामाजिक व आर्थिक विषमता दीर्घकालीन स्पर्धात्मकतेस मर्यादा निर्माण करते. तसेच भारतीय संविधानातील कलम ३८ आणि कलम ३९ ही सामाजिक न्याय, संधींची समानता आणि संसाधनांच्या न्याय्य वितरणाद्वारे समावेशक व शाश्वत स्पर्धात्मकतेस घटनात्मक अधिष्ठान प्रदान करतात. त्यामुळे विकसित भारत २०४७ या ध्येयाच्या पूर्ततेसाठी उच्च आर्थिक वृद्धीबरोबरच समावेशक, न्याय्य आणि संविधानाधिष्ठित विकास धोरण स्वीकारणे आवश्यक असल्याचे या संशोधनातून अधोरेखित होते.*

***बीजशब्द (Keywords):*** *स्पर्धात्मकता, आर्थिक विषमता, समावेशक विकास, मानवी भांडवल, भारतीय संविधान, कलम ३८, कलम ३९, विकसित भारत २०४७.*

## १. प्रस्तावना

एकविसाव्या शतकात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धात्मकता (Competitiveness) आणि समावेशक विकास (Inclusive Development) या दोन संकल्पना आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. कोणत्याही राष्ट्राची स्पर्धात्मकता ही केवळ सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या (GDP) वाढीवर अवलंबून नसून उत्पादकता, नवोन्मेष क्षमता, मानवी भांडवल, संस्थात्मक गुणवत्ता आणि सामाजिक स्थैर्य यांसारख्या घटकांवरही आधारित असते (Porter, 1990; World Economic Forum, 2019). त्याचवेळी आर्थिक वाढीचे लाभ समाजातील विविध घटकांमध्ये समानपणे वितरित न झाल्यास उत्पन्न, संपत्ती, शिक्षण, आरोग्य आणि संधींमधील विषमता वाढते, ज्यामुळे दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या शाश्वततेवर प्रतिकूल परिणाम होतो (Stiglitz, 2012; Piketty, 2014).

भारताने गेल्या तीन दशकांत उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (LPG Reforms) स्वीकारल्यानंतर उच्च आर्थिक वृद्धीचा अनुभव घेतला आहे. जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या

अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारताची ओळख निर्माण झाली असून 'विकसित भारत २०४७', पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, स्टार्टअप परिसंस्था आणि जागतिक मूल्यसाखळीत वाढता सहभाग यांमुळे भारताच्या स्पर्धात्मक क्षमतेबाबत सकारात्मक अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत (Government of India, 2024; IFC, 2026). तथापि, आर्थिक वृद्धीबरोबरच भारतामध्ये उत्पन्न व संपत्तीचे केंद्रीकरण, रोजगारातील असमानता, ग्रामीण-शहरी दरी, शिक्षण व आरोग्य सेवांमधील विषमता तसेच सामाजिक संधींच्या असमान वितरणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक अभ्यासांनी भारतामधील आर्थिक विषमता सातत्याने वाढत असल्याचे निदर्शनास आणले आहे (World Inequality Lab, 2024; Oxfam, 2024). त्यामुळे स्पर्धात्मकता आणि विषमता या संकल्पना परस्परविरोधी आहेत की परस्परपूरक, हा प्रश्न विकास अर्थशास्त्रातील महत्त्वाचा संशोधन विषय बनला आहे.

या पार्श्वभूमीवर *'Institute for Competitiveness'* यांनी प्रकाशित केलेले *State of Inequality in India Report (2022)* आणि *State of Competitiveness in India Report (2026)* हे दोन अहवाल विशेष महत्त्वाचे ठरतात. पहिला अहवाल भारतातील बहुआयामी विषमतेचे विश्लेषण करतो, तर दुसरा अहवाल भारताच्या स्पर्धात्मक क्षमतेचे निर्धारण करणाऱ्या संरचनात्मक घटकांचे परीक्षण करतो. या दोन्ही अहवालांचे तुलनात्मक आणि चिकित्सक विश्लेषण केल्यास भारतीय विकास प्रक्रियेतील एक मूलभूत विरोधाभास स्पष्ट होतो; आर्थिक वृद्धी आणि स्पर्धात्मकतेत वाढ होत असली तरी तिचे लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नाहीत. आधुनिक विकास अर्थशास्त्रानुसार दीर्घकालीन स्पर्धात्मकता ही मानवी भांडवल, सामाजिक समावेशन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास आणि संधींच्या न्याय्य वितरणावर आधारित असते (Acemoglu & Robinson, 2012; OECD, 2015). त्यामुळे सामाजिक विषमता कमी करणे हे केवळ कल्याणकारी धोरणाचे उद्दिष्ट नसून आर्थिक उत्पादकता आणि राष्ट्रीय स्पर्धात्मकता वृद्धिंगत करण्याची पूर्वअट मानली जाते. भारतीय संविधानातील राज्याच्या धोरणाच्या निदेशक तत्त्वांमध्ये, विशेषतः कलम ३८ आणि कलम ३९, सामाजिक व आर्थिक न्याय, संधींची समानता आणि संपत्तीचे न्याय्य वितरण यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे समता आणि स्पर्धात्मकता यांचा समन्वय हा केवळ आर्थिक धोरणाचा प्रश्न नसून भारतीय राज्यघटनेच्या विकासदृष्टीचाही अविभाज्य भाग आहे.

त्यादृष्टीने, प्रस्तुत संशोधन लेखामध्ये *State of Inequality in India Report (2022)* आणि *State of Competitiveness in India Report (2026)* या अहवालांचे तुलनात्मक व चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच स्पर्धात्मकता आणि विषमता यांतील परस्परसंबंधाचा विकास अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून भारतीय संविधानातील कलम ३८ आणि ३९ यांच्या आधारे समावेशक व शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक दिशेचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### २. स्टेट ऑफ इनइक्वॅलिटी इन इंडिया अहवालाचा आढावा

भारताने 1991 नंतरच्या आर्थिक सुधारणांमुळे उच्च आर्थिक वृद्धीचा अनुभव घेतला असला, तरी त्या वृद्धीचे लाभ समाजातील विविध सामाजिक व आर्थिक गटांमध्ये समान प्रमाणात वितरित झालेले नाहीत. परिणामी उत्पन्न, संपत्ती, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि मूलभूत सेवांच्या उपलब्धतेमध्ये लक्षणीय असमानता निर्माण झाली आहे (World Inequality Lab, 2024). या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या विनंती वरून *'Institute for Competitiveness'* यांनी प्रकाशित केलेला *State of Inequality in India Report (2022)* हा अहवाल भारतातील विषमतेचे बहुआयामी विश्लेषण करणारा एक महत्त्वपूर्ण अधिकृत दस्तऐवज आहे. हा अहवाल विषमतेकडे केवळ उत्पन्नातील तफावत म्हणून न पाहता, सामाजिक संधी, मानवी विकास, जीवनमान

आणि सार्वजनिक सेवांमधील असमान प्रवेश या व्यापक चौकटीतून तिचे विश्लेषण करतो. त्यामुळे हा अहवाल भारतातील विकास प्रक्रियेचे सामाजिक परिणाम समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण संदर्भसाहित्य मानता येईल.

### २.१ विषमतेची संकल्पना : बहुआयामी दृष्टिकोन

आधुनिक विकास अर्थशास्त्रात 'विषमता' (Inequality) ही संकल्पना केवळ उत्पन्नातील फरकापुरती मर्यादित नसून संधी, शक्तता (Capabilities) आणि संसाधनांच्या असमान वितरणाशी संबंधित मानली जाते (Sen, 1999; Atkinson, 2015). अमर्त्य सेन यांच्या शक्तता दृष्टिकोन (Capability Approach) नुसार व्यक्तींच्या वास्तविक विकासक्षमतेवर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि संस्थात्मक अडथळ्यांमुळे विषमता निर्माण होते.

याच दृष्टिकोनाशी सुसंगतपणे या अहवालामध्ये विषमता ही उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सामाजिक संरक्षण यांसारख्या विविध घटकांच्या असमान वितरणातून निर्माण होणारी बहुआयामी प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे (IFC, 2022). अहवालात विशेषतः जात, लिंग, धर्म, प्रदेश आणि सामाजिक स्तर यांच्या आधारे निर्माण होणाऱ्या संरचनात्मक विषमतेवर भर देण्यात आला आहे.

### २.२ उत्पन्नातील विषमता

भारतातील आर्थिक विषमतेचा सर्वाधिक प्रकर्षाने दिसणारा पैलू म्हणजे उत्पन्नाचे असमान वितरण होय. अहवालात Periodic Labour Force Survey (PLFS) च्या आकडेवारीचा आधार घेत देशातील वेतन वितरणातील असमानता अधोरेखित करण्यात आली आहे.

अहवालानुसार देशातील सर्वोच्च 10 टक्के वेतनधारकांकडे एकूण वेतन उत्पन्नाचा सुमारे एकतृतीयांश हिस्सा केंद्रित असून, सर्वोच्च 1 टक्के गटाकडेही उत्पन्नाचा असमान प्रमाणात मोठा वाटा आहे (IFC, 2022). त्याउलट खालच्या 50 टक्के लोकसंख्येकडे राष्ट्रीय उत्पन्नातील तुलनेने अत्यल्प हिस्सा उपलब्ध आहे. विशेषतः 2019–20 मध्ये दरमहा सुमारे ₹25,000 वेतन मिळविणारी व्यक्ती देशातील सर्वोच्च 10 टक्के वेतनधारकांमध्ये मोडत असल्याचे निरीक्षण भारतीय श्रमबाजारातील व्यापक वेतनविषमतेचे निदर्शक मानले जाते. हे निष्कर्ष भारतातील वाढत्या उत्पन्न ध्रुवीकरणाकडे निर्देश करतात.

### २.३ रोजगार व श्रमबाजारातील विषमता

श्रमबाजारातील असमानता ही भारतातील आर्थिक विषमतेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. अहवालानुसार महिलांचा श्रमशक्ती सहभाग दर (Labour Force Participation Rate) तुलनेने कमी असून, उच्च शिक्षण घेतलेल्या युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते (IFC, 2022).

या परिस्थितीत शिक्षण आणि रोजगार यांच्यातील विसंगती (Skill Mismatch) स्पष्ट होते. उच्च शिक्षणाचा विस्तार झाला असला तरी त्यास अनुरूप गुणवत्तापूर्ण रोजगारनिर्मिती अपेक्षित प्रमाणात झालेली नाही. परिणामी शिक्षित बेरोजगारी, अल्परोजगार (Underemployment) आणि अनौपचारिक रोजगार यांसारख्या समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत (ILO, 2024).

### २.४ आरोग्यविषयक विषमता

मानवी विकासामध्ये आरोग्य हा मूलभूत घटक मानला जातो. तथापि भारतामध्ये सार्वजनिक आरोग्य सुविधांतील प्रादेशिक आणि सामाजिक तफावत अद्याप लक्षणीय आहे. अहवालानुसार कुपोषण, रक्तक्षय (Anaemia), बालमृत्यू तसेच आरोग्य सेवांवरील खिशातून करावा लागणारा खर्च (Out-of-Pocket Expenditure) हे गरीब कुटुंबांच्या आर्थिक असुरक्षिततेची प्रमुख कारणे आहेत (IFC, 2022).

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुष्मान भारत आणि पोषण अभियान यांसारख्या योजनांमुळे काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी सार्वत्रिक, दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे अजूनही भारतासमोरील महत्त्वाचे धोरणात्मक आव्हान आहे (WHO, 2024).

### २.५ शिक्षणातील विषमता

शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे (Social Mobility) सर्वात प्रभावी साधन मानले जाते. अहवालानुसार शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली असली तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या उपलब्धतेमध्ये ग्रामीण-शहरी, सामाजिक आणि आर्थिक स्तरांनुसार मोठी तफावत कायम आहे (IFC, 2022).

शिक्षणातील ही असमानता पुढील काळात रोजगार, उत्पन्न आणि सामाजिक सक्षमीकरणावर परिणाम करते. परिणामी पिढ्यान्पिढ्या विषमता कायम राहण्याची शक्यता वाढते (UNDP, 2024).

### २.६ सामाजिक संरक्षण आणि सार्वजनिक धोरणे

अहवालात सामाजिक संरक्षणाच्या विविध योजनांचा विषमता कमी करण्यातील सकारात्मक प्रभाव अधोरेखित करण्यात आला आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली, थेट लाभ हस्तांतरण (DBT), राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना, आयुष्मान भारत आणि इतर सामाजिक सुरक्षा कार्यक्रमांमुळे अत्यंत गरीब घटकांना संरक्षण मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे (IFC, 2022).

तथापि, आधुनिक विकास अर्थशास्त्रानुसार सामाजिक संरक्षण योजना गरिबी कमी करण्यासाठी उपयुक्त असल्या तरी त्या विषमतेची संरचनात्मक कारणे दूर करण्यासाठी पुरेशा ठरत नाहीत. उत्पादन साधनांवरील प्रवेश, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास आणि उत्पादक रोजगारनिर्मिती यांशिवाय दीर्घकालीन समावेशक विकास शक्य होत नाही (OECD, 2015).

### २.७ चिकित्सक मूल्यांकन

*State of Inequality in India Report (2022)* हा भारतातील विषमतेचे अधिकृत आणि बहुआयामी विश्लेषण करणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. PLFS, NFHS आणि इतर अधिकृत सांख्यिकीय स्रोतांचा वापर करून अहवालाने उत्पन्न, शिक्षण, आरोग्य आणि रोजगारातील असमानतेचे वस्तुनिष्ठ चित्र सादर केले आहे. त्यामुळे सार्वजनिक धोरणे तयार करण्यासाठी हा अहवाल उपयुक्त आधार प्रदान करतो. तथापि, संशोधनात्मक दृष्टीकोनातून काही मर्यादा अधोरेखित करता येतात.

प्रथम, अहवाल मुख्यतः वेतन उत्पन्न (Wage Income) आणि अधिकृत नमुना सर्वेक्षणांवर आधारित असल्यामुळे संपत्तीतील विषमता (Wealth Inequality), भांडवली उत्पन्न, शेअर बाजारातील मालकी, वारसाहक्कातील संपत्ती आणि कॉर्पोरेट मालमत्तेचे केंद्रीकरण यांचे विश्लेषण मर्यादित स्वरूपात आढळते. आधुनिक विषमता अभ्यासामध्ये संपत्तीचे वितरण हे उत्पन्नापेक्षा अधिक प्रभावी निर्देशक मानले जाते (Piketty, 2014; World Inequality Lab, 2024). दुसरे म्हणजे, अहवालात सामाजिक संरक्षण योजनांच्या सकारात्मक परिणामांवर अधिक भर दिला असला तरी विषमतेची संरचनात्मक कारणे; उदा. भांडवलाचे केंद्रीकरण, कररचना, आर्थिक उदारीकरणाचे वितरणात्मक परिणाम आणि संस्थात्मक असमानता; यांचे तुलनेने सखोल विश्लेषण आढळत नाही. तिसरे म्हणजे, Oxfam (2024) आणि World Inequality Lab (2024) यांच्या अभ्यासांमध्ये भारतातील सर्वोच्च 1 टक्के लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीचा अत्यंत मोठा हिस्सा केंद्रित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निष्कर्षांच्या तुलनेत सरकारी अहवालातील विश्लेषण तुलनेने संयमित (Conservative) स्वरूपाचे दिसून येते.

एकूणच, हा अहवाल भारतातील विषमतेचे अधिकृत बहुआयामी चित्र समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त दस्तऐवज असला, तरी भारतातील आर्थिक विषमतेचे संपूर्ण स्वरूप समजण्यासाठी World Inequality Lab**,** Oxfam आणि इतर स्वतंत्र संशोधन संस्थांच्या निष्कर्षांचा तुलनात्मक वापर करणे आवश्यक ठरते. अशा तुलनात्मक दृष्टिकोनातूनच भारतातील वाढती विषमता आणि तिचे दीर्घकालीन आर्थिक परिणाम अधिक व्यापकपणे समजून घेता येतात.

## ३. स्टेट ऑफ कॉम्पिटिटिव्हनेस इन इंडिया अहवालाचा आढावा

भारताने 'विकसित भारत २०४७' या दीर्घकालीन विकास उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल सुरू केली असताना आर्थिक

वृद्धीची गुणवत्ता, उत्पादकता, नवोन्मेष क्षमता आणि मानवी भांडवल यांचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाशित झालेला *'State of Competitiveness in India Report (2026)'* हा अहवाल भारताच्या दीर्घकालीन स्पर्धात्मक क्षमतेचे विश्लेषण करणारा महत्त्वपूर्ण धोरणात्मक दस्तऐवज आहे. अहवालाचा मुख्य उद्देश भारताच्या विकासाचा वेग टिकवून ठेवण्यासाठी उत्पादकता, नवोन्मेष, वित्तीय प्रणाली, मानवी भांडवल, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय शाश्वतता या घटकांची सुसंगत चौकट विकसित करणे हा आहे. आधुनिक विकास अर्थशास्त्रानुसार एखाद्या राष्ट्राची स्पर्धात्मकता ही केवळ कमी उत्पादन खर्च किंवा निर्यातवाढ यावर अवलंबून नसून उपलब्ध संसाधनांचे अधिक मूल्यनिर्मितीत (Value Creation) रूपांतर करण्याच्या क्षमतेवर आधारित असते (Porter, 1990). जागतिक आर्थिक मंच देखील स्पर्धात्मकतेची व्याख्या उत्पादकता, संस्थात्मक गुणवत्ता, नवोन्मेष आणि मानवी भांडवल यांच्या एकत्रित परिणामाच्या स्वरूपात करतो (WEF, 2019). याच विचारसरणीशी सुसंगतपणे प्रस्तुत अहवाल भारताच्या स्पर्धात्मकतेचे विश्लेषण उत्पादकता-केंद्रित (Productivity-led Competitiveness) दृष्टिकोनातून करतो.

### ३.१ स्पर्धात्मकतेची संकल्पना : उत्पादकता-केंद्रित दृष्टिकोन

अहवालानुसार स्पर्धात्मकता म्हणजे एखाद्या अर्थव्यवस्थेची श्रम, भांडवल, तंत्रज्ञान आणि संस्थात्मक संसाधनांचे अधिक कार्यक्षम उत्पादनक्षमतेत रूपांतर करण्याची क्षमता होय. ज्या अर्थव्यवस्थांमध्ये उत्पादकता अधिक असते त्या अर्थव्यवस्था उच्च उत्पन्न, गुणवत्तापूर्ण रोजगार, नवोन्मेष आणि दीर्घकालीन आर्थिक समृद्धी निर्माण करण्यास सक्षम असतात. त्यामुळे स्पर्धात्मकतेचा संबंध अल्पकालीन खर्च स्पर्धेपेक्षा दीर्घकालीन उत्पादकता वृद्धीशी अधिक निकटचा आहे (Porter, 1990; OECD, 2026). अहवालामध्ये भारताची तुलना अमेरिका, चीन, जर्मनी, जपान, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम आणि ब्राझील यांसारख्या विकसित व उदयोन्मुख अर्थव्यवस्थांशी करण्यात आली आहे. या तुलनात्मक विश्लेषणातून भारताच्या सामर्थ्यांबरोबरच संरचनात्मक मर्यादाही स्पष्ट होतात.

### ३.२ भारताची स्पर्धात्मक स्थिती

अहवालानुसार भारताने गेल्या दशकात उच्च आर्थिक वृद्धी साधली असली तरी उत्पादकतेच्या दृष्टीने विकसित अर्थव्यवस्थांशी तसेच काही उदयोन्मुख देशांशी असलेली दरी अद्याप कायम आहे. प्रति कामगार उत्पादनामध्ये (Output per Worker) भारताने सातत्यपूर्ण प्रगती केली असली तरी चीन, इंडोनेशिया आणि व्हिएतनाम यांसारख्या देशांच्या तुलनेत भारताची उत्पादकता अद्याप कमी आहे. तथापि 2010 ते 2024 या कालावधीत भारताच्या उत्पादकतेतील वाढीचा दर अनेक विकसित अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

ही स्थिती भारतासमोर दुहेरी आव्हान निर्माण करते. एकीकडे आर्थिक वृद्धीचा वेग कायम ठेवणे आवश्यक आहे, तर दुसरीकडे त्या वृद्धीची गुणवत्ता सुधारून उत्पादनक्षमता वाढविणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे भारतासाठी "Growth with Productivity" हा भविष्यातील विकासाचा प्रमुख आधार ठरतो.

### ३.३ स्पर्धात्मकतेचे प्रमुख स्तंभ

अहवालात भारताच्या स्पर्धात्मकतेचे मूल्यांकन पुढील पाच परस्परावलंबी स्तंभांच्या आधारे करण्यात आले आहे.

**(अ) वित्तीय प्रवेश (Access to Finance)**

उत्पादनक्षम उद्योगांना विशेषतः सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSMEs) परवडणारा आणि वेळेवर वित्तपुरवठा उपलब्ध होणे स्पर्धात्मकतेसाठी अत्यावश्यक मानले गेले आहे. वित्तीय समावेशनात भारताने उल्लेखनीय प्रगती केली असली तरी भांडवलाचे कार्यक्षम वितरण आणि दीर्घकालीन औद्योगिक गुंतवणुकीसाठी वित्तीय प्रणाली अधिक सक्षम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

**(आ) मानवी भांडवल (Human Capital)**

भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची तरुण लोकसंख्या होय. तथापि केवळ लोकसंख्येचा आकार स्पर्धात्मकतेची हमी देत नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास, सार्वजनिक आरोग्य आणि महिलांचा श्रमबाजारातील सहभाग या घटकांवरच भविष्यातील उत्पादकता अवलंबून राहणार असल्याचे अहवाल स्पष्ट करतो. हा दृष्टिकोन मानवी भांडवल सिद्धांताशी (Becker, 1964) सुसंगत आहे.

**(इ) नवोन्मेष क्षमता (Innovation Capacity)**

भारताने स्टार्टअप परिसंस्था, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि संशोधनाचे (R&D) व्यापारीकरण, पेटंट निर्मिती, उद्योग-विद्यापीठ सहकार्य आणि उच्च तंत्रज्ञान उत्पादन यामध्ये सुधारणा आवश्यक असल्याचे अहवाल नमूद करतो. ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये नवोन्मेष ही दीर्घकालीन स्पर्धात्मकतेची प्रमुख प्रेरक शक्ती मानली जाते.

**(ई) भौतिक व डिजिटल पायाभूत सुविधा**

अहवालानुसार महामार्ग, रेल्वे, बंदरे, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (UPI, Aadhaar इत्यादी) आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात भारताने मोठी गुंतवणूक केली आहे. तथापि डिजिटल उपलब्धता (Digital Access) आणि डिजिटल उत्पादकता (Digital Productivity) यांमध्ये अजूनही अंतर आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा उद्योग आणि श्रम उत्पादकतेवर अधिक परिणाम घडवून आणणे आवश्यक ठरते.

**(उ) पर्यावरणीय शाश्वतता**

जागतिक स्तरावर हरित विकास आणि हवामान बदलाला प्रतिसाद देणारी अर्थव्यवस्था ही स्पर्धात्मकतेचा अविभाज्य घटक बनली आहे. स्वच्छ ऊर्जा, ऊर्जा कार्यक्षमता, कार्बन उत्सर्जनात घट आणि शाश्वत औद्योगिक विकास या घटकांना अहवालात भविष्यातील स्पर्धात्मकतेचे महत्त्वपूर्ण निर्धारक मानले आहे.

**३.४ भारताच्या स्पर्धात्मकतेसाठी परिवर्तनात्मक दिशा**

अहवाल भारताच्या स्पर्धात्मकतेसाठी चार मूलभूत परिवर्तनांची आवश्यकता अधोरेखित करतो—

- लोकसंख्येच्या आकारापासून कौशल्याधारित मानवी भांडवलाकडे.
- डिजिटल पोहोचेपासून डिजिटल उत्पादकतेकडे.
- मर्यादित नवोन्मेषापासून व्यापक नवोन्मेष परिसंस्थेकडे.
- पारंपरिक विकासापासून पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकासाकडे.

ही रूपांतरे भारताला मध्यम-उत्पन्न अर्थव्यवस्थेपासून उच्च उत्पादकता असलेल्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे नेणारी धोरणात्मक दिशा दर्शवितात.

**३.५ चिकित्सक मूल्यांकन**

हा भारताच्या स्पर्धात्मक क्षमतेचे आधुनिक, बहुआयामी आणि उत्पादकता-केंद्रित विश्लेषण करणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. उत्पादकता, मानवी भांडवल, वित्तीय प्रणाली, नवोन्मेष, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय शाश्वतता यांमधील परस्परसंबंध स्पष्ट करण्याचा अहवालाचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. तथापि संशोधनात्मक दृष्टीने या अहवालाच्या काही मर्यादा स्पष्टपणे दिसून येतात-

प्रथम, अहवाल उत्पादकता आणि आर्थिक कार्यक्षमतेवर अधिक भर देतो; परंतु सामाजिक विषमता, जातीय व लैंगिक भेदभाव, प्रादेशिक असमतोल आणि संस्थात्मक विषमता यांसारख्या संरचनात्मक घटकांचा स्पर्धात्मकतेवर होणारा परिणाम तुलनेने मर्यादित स्वरूपात चर्चिला आहे. आधुनिक विकास साहित्यामध्ये समावेशक स्पर्धात्मकता (Inclusive Competitiveness) ही दीर्घकालीन उत्पादकतेची पूर्वअट मानली जाते (OECD, 2026). दुसरे म्हणजे, अहवालात आर्थिक वृद्धी आणि उत्पादकता यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यात आला असला तरी त्या वृद्धीचे वितरण (Distribution of Growth) आणि त्याचा सामाजिक समावेशनावर होणारा परिणाम यांचे विश्लेषण

तुलनेने अपुरे आहे. उच्च उत्पादकता जर केवळ उच्च कौशल्यधारक, मोठ्या उद्योगसमूह किंवा महानगरांपुरती मर्यादित राहिली, तर राष्ट्रीय स्पर्धात्मकतेबरोबरच सामाजिक विषमताही वाढू शकते. तिसरे म्हणजे, डिजिटल परिवर्तनावर भर देताना ग्रामीण-शहरी डिजिटल दरी, कौशल्यातील तफावत, संशोधनावरील सार्वजनिक खर्च आणि शिक्षणाच्या गुणवत्तेतील असमानता या मूलभूत प्रश्नांना अधिक सखोलपणे स्थान दिले असते, तर अहवालाची विश्लेषणात्मक व्याप्ती अधिक व्यापक झाली असती.

एकूणच, State of Competitiveness in India Report (2026) हा भारताच्या दीर्घकालीन विकास धोरणासाठी अत्यंत उपयुक्त संदर्भदस्तऐवज आहे. तथापि, भारताच्या स्पर्धात्मकतेचे वास्तव समजून घेण्यासाठी उत्पादकतेबरोबरच सामाजिक समावेशन, मानवी विकास, संस्थात्मक गुणवत्ता आणि आर्थिक न्याय यांचा समन्वित विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्पर्धात्मकता ही केवळ आर्थिक कार्यक्षमतेची संकल्पना नसून समावेशक विकासाशी निगडित सामाजिक-आर्थिक प्रक्रिया आहे.

### ४. स्पर्धात्मकता आणि विषमता यातील संबंधाचे चिकित्सक विश्लेषण

आधुनिक विकास अर्थशास्त्रामध्ये स्पर्धात्मकता आणि आर्थिक विषमता या दोन संकल्पना परस्परविरोधी नसून परस्परावलंबी मानल्या जातात. पारंपरिक नव-अभिजात अर्थशास्त्रानुसार स्पर्धात्मकता वाढल्यास उत्पादकता, गुंतवणूक आणि आर्थिक वृद्धी वाढते, ज्याचा लाभ कालांतराने समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचतो. या दृष्टिकोनाला *'Trickle-down Theory'* म्हणून ओळखले जाते. तथापि गेल्या तीन दशकांतील जागतिक अनुभव तसेच आधुनिक संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की आर्थिक वृद्धीचे लाभ आपोआप सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचत नाहीत; उलट योग्य सार्वजनिक धोरणांचा अभाव असल्यास स्पर्धात्मकतेबरोबर आर्थिक विषमताही वाढू शकते (Stiglitz, 2012; Piketty, 2014). याच कारणामुळे आधुनिक विकास साहित्यामध्ये 'समावेशक स्पर्धात्मकता' (Inclusive Competitiveness) ही संकल्पना उदयास आली आहे. या दृष्टिकोनानुसार कोणत्याही राष्ट्राची स्पर्धात्मकता दीर्घकालीन टिकून राहण्यासाठी आर्थिक वृद्धीबरोबर सामाजिक न्याय, मानवी विकास, संधींची समानता आणि संस्थात्मक समावेशकता यांची जोड आवश्यक असते (World Economic Forum, 2019; OECD, 2025).

### ४.१ स्पर्धात्मकतेमुळे विषमता वाढण्याची शक्यता : नवउदार आर्थिक व्यवस्थेचा अनुभव

1990 नंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि तंत्रज्ञानाधारित उत्पादन व्यवस्थेमुळे अनेक देशांमध्ये उत्पादकता आणि आर्थिक वृद्धीमध्ये लक्षणीय वाढ झाली. भारतात माहिती तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था, वित्तीय सेवा, औषधनिर्मिती, दूरसंचार आणि सेवा क्षेत्राने जागतिक स्पर्धात्मकतेत उल्लेखनीय प्रगती केली. तथापि या विकासाचा लाभ सर्व सामाजिक गटांना समान प्रमाणात मिळालेला दिसत नाही.

उच्च कौशल्याधारित क्षेत्रांमध्ये कार्यरत व्यक्तींचे उत्पन्न आणि संपत्ती झपाट्याने वाढली; परंतु कृषी क्षेत्र, असंघटित कामगार, ग्रामीण लोकसंख्या आणि अल्पकौशल्यधारक कामगार यांचे उत्पन्न तुलनेने स्थिर राहिले. परिणामी आर्थिक वृद्धीचे रूपांतर अनेकदा "Jobless Growth", "Skill-biased Growth" किंवा "Unequal Growth" मध्ये झाले (ILO, 2024). थॉमस पिकेटी (2014) यांच्या $r > g$ सिद्धांतानुसार भांडवलावरील परतावा दर हा आर्थिक वृद्धीच्या दरापेक्षा जास्त राहिल्यास संपत्तीचे केंद्रीकरण वेगाने वाढते. भारतातील भांडवली बाजाराचा विस्तार, तंत्रज्ञानाधारित उद्योगांची वाढ आणि मालमत्तेच्या किंमतींमध्ये झालेली वाढ यांचा सर्वाधिक लाभ उच्च उत्पन्न गटांना मिळाल्याचे विविध संशोधनातून स्पष्ट झाले आहे (World Inequality Lab, 2024). त्यामुळे स्पर्धात्मकता वाढली असली तरी उत्पन्न आणि संपत्तीतील विषमताही वाढली आहे.

### ४.२ विषमता ही स्पर्धात्मकतेसाठी संरचनात्मक अडथळा

पारंपरिक विकास सिद्धांतामध्ये विषमता ही आर्थिक विकासाची अपरिहार्य किंमत मानली जात होती. परंतु